नि.फौ.ख.क्र.३८/२०१३

सरकार –वि– जनार्धन

निशाणी क्र. ११२ खालील

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ जयश्री किरण पवार यांचा सरकारी पक्षातर्फे पुढील सरतपास शपथेवर चालू**

०१. खरेदीखत रद्द केलेले असतांनाही आरोपी क्र. ०१ ने सन २००६ चे जुने उतारे जोडून दुय्यम निबंधक चांदवड, व तलाठींशी संगनमत करुन मिळकतीवर सोसायटीचा बोझा असताना आरोपी क्र. ०२ च्या नावे खरेदीपत्र करुन दिले. मिळकतीवर सोसायटीचा बोझा होता हे दाखविणारे कागदपत्र माझ्याकडे आहेत ते मी पुढील तारेखस दाखल करते.

०२. मला आता गट नं. २६२ चा ७/१२ उतारा दाखविण्यात आला. तो ७/१२ उतारा तोच आहे. त्याला **निशाणी ११९** देण्यात येते. ज्या बाबतीत दुय्यम निबंधक चांदवड, तलाठी व आरोपींनी संगनमत करुन खोटे खरेदीपत्र तयार केले. आरोपी क्र. ०१ ने आरोपी क्र. ०२ च्या नावे ज्या मुखत्यापत्र आधारे खरेदी पत्र करुन दिले ते खरेदीपत्र मला आता दाखविले ते तेच आहे. त्याला **निशाणी १२०** देण्यात येते. त्यामुळे आरोपींविरुद्ध केस दाखल केली. त्याचा फौजदारी चौकशी अर्ज क्र. ५०/२०१२ आहे.

०३. मी माझ्या पतीची सही ओळखते. मला आता फौजदारी चौकशी अर्ज क्र. ५०/२०१२ दाखवला त्यावर माझ्या पतीची सही आहे. ती मी ओळखते. मी आरोपींना ओळखते. ते आज न्यायालयात हजर आहेत.

सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन कागदपत्र दाखल करण्यासाठी सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्विकृत,

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.06.24 11:33:41 +0530

दि. २०.०६.२०२५

(वृषाली दी. सुंगारे)
सह दिवाणी न्यायदंडाधिकारी,
चांदवड.